दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

facebook page /Diwanews


**चार सदस्यांचा एक प्रभाग करावा सरनाईकांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी...**

(पान..५ वाचा)


वर्ष-१ ♦ अंक - ५१ ♦ सोमवार,२५ जुलै २०२२ ♦ पाने-८ ♦ किमंत-४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


# वाहतूक कोंडीमुळे नाहक त्रास

## तिसरा खाडीपूल वाहतुकीसाठी खुला करा- आमदार डॉ. जितेंद्र आव्हाड

**ठाणे :** ठाण्यातील वाहतूक कोंडीमुळे कळवेकरांनाही नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे खाडीवरील तिसरा पूल जेवढा झाला आहे; तेवढा तरी वाहतुकीसाठी खुला करावा, अशी मागणी माजी मंत्री तथा कळवा-मुंब्रा विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी पालिका आयुक्त डॉ. विपीन शर्मा यांच्याकडे एका पत्राद्वारे केली आहे.

सन २०१३-१४ साली जेव्हा असीम गुप्ता हे ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त होते; तेव्हा कळव्याचा पहिला पुल खचल्यानंतर दुसर्या पुलाची निर्मिती झाल्यानंतर त्याच्यावर होणारी वाहतुक कोंडी लक्षात घेता त्यावर उपाय म्हणून कळवा खाडीवर तिसर्या पुलाची निर्मिती करावी अशी मागणी डॉ. आव्हाड यांनी केली होती. या मागणीला तत्कालीन आयुक्त गुप्ता यांनी हिरवा कंदील दाखवून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली होती.

कळवा खाडीवरील हा तिसरा पुल आता जवळ-जवळ वाहतुकीसाठी तयार झाला आहे. शहरातील सध्याची परिस्थिती पाहता वाहतुक कोडीने लोक हैराण झाले आहेत. कळव्यातील रस्त्यांवर खड्डे नसल्यामुळे अंतर्गत प्रवासासाठी नागरिकांना कुठेही अडचण येत नाही. परंतु, ठाण्यात जाण्यासाठी कळवा पूल ओलांडावा लागत आहे.

त्यातच ठाणे शहरात प्रचंड वाहतूक कोंडी होत असल्याने त्याचा ताण कळव्यातील वाहतुकीवर पडत आहे. उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार कळव्यामध्ये विशिष्ट वेळेत जड वाहनाना वाहतुक करण्यास बंदी घालण्यात आली आहे. पण, त्या गोष्टीकडे सोयीस्कररित्या दुर्लक्ष केले जात आहे. त्याचा परिणाम, विद्यार्थी आणि नोकरदारांना सहन करावा लागत आहे. यामध्ये समान्य नागरिकांची काहीच चूक नाही.

त्यामुळे कमीत-कमी जो पूल तयार झाला आहे; तो नागरिकांच्या वापरासाठी सुरु करावा, जेणेकरुन थोडीफार वाहतुक कोंडी कमी होण्यास मदत होईल, असे डॉ. आव्हाड यांनी आपल्या पत्राद्वारे केली आहे.

दरम्यान, पोलीस आयुक्तांनी मा. उच्च न्यायालयाचा आदेश मानून त्यापद्धतीने वाहतुकीची व्यवस्था करायला हवी. पण, हे कितीवेळा आणि कोणाला सांगायचे. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशालाही केराची टोपली दाखवणार असाल तर मग तक्रारच कोणाकडे करायची. मला वाटते कायद्याचे पालन व्हायला हवे. मा. उच्च न्यायालयाचे आदेश मानायला हवेत, अशी सूचनाही डॉ. आव्हाड यांनी आपल्या पत्रात केली आहे.

### मुख्यमंत्र्यांचे आठवडाभरात बैठकीचे आश्वासन !

## ठामपास्तरावर जातनिहाय मिनीसर्वे करुन ओबीसींना न्याय द्या - दशरथदादा पाटील

**ठाणे:** बंठिया आयोगाच्या अहवालावर आक्षेप नोंदवून ओबीसींची पारदर्शक जातनिहाय मिनीसर्वे करुन ठाणे महापालिकास्तरावर ओबीसी लोकप्रतिनिधींची प्रभाग संख्या वाढवावी आणि ओबीसींना न्याय द्यावा, असे आवाहन ओबीसी जनमोर्चाचे उपाध्यक्ष दशरथदादा पाटील यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना एका निवेदनाद्वारे केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद दिला असून यासंदर्भात आठवडाभरात बैठक बोलावणार असल्याची माहिती पाटील यांनी दिली आहे.

दिवा प्रभाग समिती परिसरात महापालिकेत सामील झालेले सर्व खेडी ही आगरी व कोळी समाजाची होती. येथे मोठ्यासंख्येने स्थायिक झालेला समाज हा कोकणातील कुणबी समाज आहे. म्हणजेच येथे ७० टक्के समाज हा ओबीसी समाज असताना येथील पॅनेलमधील सर्व नगरसेवक हे शंभर टक्के ओबीसी राखीव असायला हवे, अशी स्थिती असताना बंठिया आयोगाने येथे फक्त दोनच ओबीसी नगरसेवकांचे आरक्षण टाकले आहे. तर संपूर्ण ठाणे महापालिकाक्षेत्रात ओबीसींच्या जागा ३५ वरुन १४ वर आलेल्या आहेत, कमी केलेल्या आहेत . हा ओबीसीं समाजावर सरळ सरळ अन्याय आहे. महाराष्ट्रात १९३१ च्या जनगणनेनुसार ओबीसीं समाजाची लोकसंख्या ही ५४ टक्के असताना आणि मंडळ आयोगाच्या यादीनुसार ओबीसींच्या यादीत २७२ जाती असताना व या यादीत भर पडून या यादीतील ओबीसी जातींची संख्या ३४९ वर गेलेली असताना, ओबीसींची लोकसंख्या ५२ टक्के पेक्षा कमी करुन ती ३७ टक्क्यावर आणली गेली. न्यायालयाने बंठिया आयोगाच्या कार्यपद्धतीला केव्हाही आव्हान दिले जाऊ शकते अशी परवानगी दिली आहे. कारण ओबीसीं समाजाचे सर्वेक्षण करण्यासाठी आयोगाने आखलेली कार्यपद्धती ही अशास्त्रीय आहे. ठाण्याची ओबीसीं लोकसंख्या ५० टक्क्याहून अधिक असताना १०.४ टक्के इतकीच दाखविली आहे. कारण आयोगाने आडनावावरून जाती शोधण्याचे काम केले ही पध्दत पुर्णपणे सदोष आहे. यामुळे भविष्यात ओबीसींचे नोकरी, शिक्षण, राजकीय आरक्षण कमी होईल. हा संभाव्य धोका ओळखून बिहार सरकारप्रमाणे, महाराष्ट्र सरकारने ठाणे महापालिकास्तरावर ओबीसींचे जातनिहाय मिनीसर्वे करुन ओबीसींच्या प्रभागनिहाय जागा वाढवाव्यात अशी मागणी पाटील यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे शिष्टमंडळासोबत भेटून केली. यावर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री शिंदे यांनी या मागणीवर येत्या आठवडाभरात सविस्तर बैठक घेऊन विचार करु असे आश्वासन शिष्टमंडळाला दिले.

या शिष्टमंडळात पाटील यांच्यासह शिंदे गटाचे ठाणे जिल्हाप्रमुख नरेश म्हस्के, मा. नगरसेवक उमेश पाटील, युवा सेना सरचिटणीस राकेश पाटील, आदी मान्यवर उपस्थित होते.


आठवड्याची रोखठोक मुलाखत

दिवा न्यूज

पुढील अंकापासून..
आपला अंक राखून ठेवा!

# मुख्यमंत्र्यांचा ३० जुलै रोजी ठाणेकरांकडून नागरी जनसत्कार

ठाणे : आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात प्रथमच ठाण्याला एकनाथ शिंदे यांच्या रूपात मुख्यमंत्रीपदाचा बहुमान मिळाला आहे. यानिमित्ताने ठाण्यातील विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असणऱ्या सेवाभावी तब्बल १६५ संस्थांच्या तर्फे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा येत्या ३० जुलै रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात नागरी जनसत्कार करण्यात येणार आहे. या जनसत्कार सोहळ्यात मुख्यमंत्र्यांच्या प्रकट मुलाखतीचे आयोजन केले असून यावेळी त्यांच्यावरील गौरवग्रंथाचेही प्रकाशन होणार आहे.

ठाण्यात मंगळवारी झालेल्या पत्रकार परिषदेत 'मुख्यमंत्री जनगौरव समिती'कडून सांगण्यात आले. यावेळी जनगौरव समितीचे अध्यक्ष विलास ठुसे, कार्याध्यक्ष प्रा. डॉ. प्रदीप ढवळ, उपाध्यक्ष मीरा कोरडे, श्रीकांत वाड, सल्लागार डॉ. जालिंदर भोर आणि विद्याधर ठाणेकर हे उपस्थित होते.

जनसत्कार सोहळ्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची त्यांच्या निवासस्थानापासून कार्यक्रमस्थळापर्यंत मिरवणूक काढण्यात येणार आहे. यात ७५ रिक्षा, ७५ मोटारसायकल, ७५ सायकल आणि ढोल-ताशा पथकांचा समावेश असणार आहे. तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे व्यक्तिमत्त्व आणि आजवरचा प्रवास यांचे दर्शन घडवणारे कवी प्रा. अशोक बागवे लिखित आणि संगीतकार कौशल इनामदार यांनी संगीत दिलेले गौरवगीत यावेळी सादर होणार आहे.

ठाण्यातील ७५ कलावंत ते सादर करतील. यावेळी पुष्पहार-पुष्पगुच्छ यांच्याऐवजी मुख्यमंत्र्यांना बीजहार देण्यात येणार असून त्यातील बियांची लागवड केली जाणार आहे. तसेच सहभागी संस्थांनी, व्यक्तींनी शुभेच्छापर पुस्तके भेट देण्याचे आवाहनही जनगौरव समितीकडून करण्यात आले आहे. ही पुस्तके ग्रामीण भागातील शाळा व ग्रंथालयांना भेट दिली जातील.

## दिवा मंडळा तर्फे बुस्टर डोस व दाखले वाटपचा कार्यक्रम



महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त दिवा मंडळा तर्फे बुस्टर डोस व दाखले वाटपचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.यावेळी दिवा मंडळ अध्यक्ष रोहिदास मुंडे,ठाणे शहर कार्यकारी सदस्य गणेश भगत, मंडळ सरचिटणीस समीर चव्हाण, युवराज जाधव, युवा मोर्चा अध्यक्ष सचिन भोईर, ओबीसी मोर्चा अध्यक्ष रोशन भगत ,महिला अध्यक्ष ज्योती पाटील, डॉक्टर सेल आघाडी विद्यासागर दुबे ,अंकुश मढवी,नागेश पवार,राहुल साहू ,आशिष पाटील, सुमित मढवी ,शैलेश भोईर, सुदेश पाटील,मधुकर पाटील गौरीशंकर पटवा,आनंदा पाटील ;अवधराज राजभर; विजय वाघ ;अशोक गुप्ता आधी कार्यकर्ते उपस्थित होते.

## दिव्यातील समस्या सोडवण्यासाठी पालिकेने ॲक्शन प्लॅन तयार करावा - ज्योती पाटील

**दिवा :-** शहरीकरण मोठ्या प्रमाणात होत असल्याने दिवा शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पालिका प्रशासनाने एक ॲक्शन प्लॅन तयार करावा अशी मागणी भाजपच्या महिला मंडळ अध्यक्षा ज्योती पाटील यांनी केली आहे.

भारतीय जनता पक्ष दिव्यातील नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध आहे असे सांगताना येथील नागरिकांना न्याय देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न दिवा भाजप करत असल्याचे ज्योती पाटील यांनी म्हटले आहे.

दिवा शहरातील समस्यांचा एकत्रित अभ्यास करून त्या समस्या सोडवण्यासाठी पालिका प्रशासनाने सकारात्मक दृष्टिकोन ठेऊन ॲक्शन प्लॅन तयार करावा व त्यानुसार येथील नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न करावेत असे ज्योती पाटील यांनी म्हटले आहे.

दिव्यात असणऱ्या समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी ठोस उपाययोजना गराजेच्या असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ.अरुणा किरण जाधव
मो.९९८७५१२००१

छायाचित्रकार/प्रतिनिधी
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने

**ऑफिस पत्ता:-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिश्चंद्र अपार्टमेंट च्या मागे, वारेकर शाळे जवळ, गुरूदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा ( पूर्व ) , ठाणे - ४००६१२.

## कळवा प्रभाग समिती सहाय्यक आयुक्ताने दिली अतिक्रमण आयुक्तांना जीवे मारण्याची धमकी

**ठाणे :** अतिक्रमण निष्कासन विभागाचे सहाय्यक आयुक्त महेश आहेर यांना कळवा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त समीर जाधव यांनी ठार मारण्याची तसेच कुटुंबातील सदस्यांना उद्ध्वस्त करण्याची धमकी दिल्याप्रकरणी नौपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती महेश आहेर यांनी शनिवारी ठाण्यात घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली. तर महेश आहेर हे या कारवाया करण्यात आघाडीवर आहेत. कळवा येथील काही नागरिकांनी महेश आहेर यांच्याकडे गुगल मॅपिंगसह तक्रारी केल्या होत्या. त्या अनुषंगाने महेश आहेर यांनी समीर जाधव यांना दूरध्वनीवर संपर्क साधून कळवा येथे कारवाई करण्यासाठी पथकासह येत असल्याचे सांगितले. त्यावर समीर जाधव यांनी, तुझे हातपाय तोडून ठार मारेल; तुझ्या कुटुंबालाही संपवून टाकेन, अशी धमकी दिली. या संदर्भात महेश आहेर यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून शनिवारी नौपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, आपण गेल्या अनेक दिवसांपासून बेकायदा बांधकामावर कारवाई करीत आहोत. इतर अधिकारी सहकार्य करीत असताना समीर जाधव यांनी आपणास धमकी दिली आहे.

### आहेर यांचे आरोप बिनबुडाचे - जाधव

कळवा प्रभाग समिती सहायक आयुक्त समीर जाधव यांनी आपल्यावर झालेले आरोप बिनबुडाचे असल्याचे म्हटले आहे.

गेल्या काही दिवसांपासून ठाणे शहरातील अनधिकृत बांधकामांवर मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात येत आहे. महेश आहेर हे या कारवाया

दिवा न्यूज
आपल्या प्रभागातील कार्यक्रम,समस्या,बातम्या थोडक्यात टाईप करुन आमच्याकडे पाठवा...आम्ही प्रसिध्द करु!
diwanews1@gmail.com

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिध्दकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा.लि.प्लॉट क्र.डब्लू २३०,टीटीसी खैरणे,नवी मुंबई-४००७१०येथे छापून,श्रीकृपा बिल्डींग, ए विंग,पहिला माळा,फ्लॅट क्रमांक १०१,सेंट मेरी शाळेजवळ,दिवा(पूर्व) ठाणे -६१२ ता/जि-ठाणे,राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले.संपर्क-८०८०९७७९५५
संपादक -सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhakala Print Media & Publication Pvt Ltd Plot No. W-230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai - 400710. Dist.Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Bilding,AWing,First Flr,Flat No.101,Near Sent Marry School,Diva (E),Thane-400 612 Taluka/Dist.Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale,RNI No.-MAHMAR/2021/80669**

# आतापर्यंत ३०० कोटी मालमत्ता कर वसुली गतवर्षापेक्षा वाढली ९ टक्क्यांनी वसुली

**ठाणे:** ठाणे महानगरपालिकेने मालमत्ता करदात्यांना १० टक्के सवलत दिल्याने आतापर्यंत ३०० कोटी मालमत्ता कर वसुली पूर्ण झाली आहे. ही वसुली गतवर्षापेक्षा निश्चित यंदा ०९ टक्क्यांनी वाढल्याचे संबंधित विभागाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच यावर्षी दिलेले ७०० कोटींचे टार्गेट पूर्ण करण्याचा निर्धार ही मालमत्ता कर विभागाने केला आहे. त्यासाठी प्रत्येकी प्रभाग समितींतर्गत येणारे मालमत्ता कर वसुली विभाग दर शनिवारी असा खुला ठेवण्यात भर दिला आहे. त्यातच, प्रभाग समितीस्तरावर ज्या- ज्या कर वसुली विभागाची दुरावस्था झाली आहे. त्याची तातडीने दुरुस्ती करण्यासाठी आता हालचाली सुरू केल्या आहेत.

महापालिका क्षेत्रातील जे करदाते पहिल्या सहामाहीसोबत दुसऱ्या सहामाहीचा सामान्य कर एकत्रितरित्या महापालिकेकडे जमा करतील अशा करदात्यांना त्यांचे दुसऱ्या सहामाहीच्या सामान्य करामध्ये १० टक्के सवलत एप्रिल ते १५ जून दिली होती. त्या सवलत योजनेस १५ जुलैपर्यंत प्रशासनाने मुदतवाढ दिली आहे. यावेळी, सुटीच्या दिवशी मालमत्ता कर भरता यावा याकरीता शनिवार दिवसभर तर रविवार अर्धा दिवस प्रभाग स्तरावरील कर संकलन केंद्र कार्यान्वित ठेवले होते. त्याचप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने मालमत्ता कर भरण्याची सवलत उपलब्ध करू दिली होती. त्यानुसार टार्गेट असलेल्या ७०० कोटींमधील ३०० कोटी म्हणजे ३९ टक्के मालमत्ता कर वसुली १५ जुलै पर्यंत पूर्ण झाली आहे. गतवर्षापेक्षा ९ टक्के कर वसुली यंदा अधिक आहे. गतवर्षी आतापर्यंत ३० टक्के वसुली करण्यात आली होती. तर यावर्षी दिलेले टार्गेट पूर्ण करण्याचा निर्धार केला असून त्यानुसार बैठक घेऊन कर्मचाऱ्यांना टार्गेट पूर्ण करण्यासंदर्भात मार्गदर्शन केले जात आहे. त्याचबरोबर यासाठी प्रत्येक शनिवारी दिवसभर मालमत्ता कर वसुली विभाग प्रभाग समितीस्तरावर सुरू ठेवण्यात येणार आल्याची माहिती मालमत्ता कर विभागाचे उपायुक्त गजानन गोदेपुरे यांनी दिली.

**दुरावस्था किंवा जुन्या विभागाची होणार दुरुस्ती**

कोपरी, नौपाडा, मुंब्रा, शीळ या सारख्या कर विभाग कार्यालय जुन्या इमारतीमध्ये आहे. त्यातच अन्य कार्यालयाची दुरावस्था झाल्याने त्यांची दुरुस्ती करणे गरजे आहे. त्याच अवस्थेत सुद्धा कर्मचारी काम करत आहेत. हे विभाग तातडीने दुरुस्त व्हावे, यासाठी वरीष्ठ स्तरावर हालचाली सुरू झाल्या आहेत,अशी माहिती सूत्रांनी दिली.

# द्रौपदी मुर्मू यांची राष्ट्रपती पदाची घोषणा होताच दिवा शहरात फटाके फोडून, पेढे वाटून जल्लोष



**दिवा** - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न साकार करून देशातील मागासलेल्या घटकास सर्वोच्च पदावर विराजमान केले. हा चमत्कार फक्त भारतीय जनता पक्षात पंतप्रधानांच्या विचारांनी घडू शकतो असे दिवा शहर मंडळ अध्यक्ष रोहिदास मुंडे यांनी सांगितले. आदिवासी महिलेला राष्ट्रपती बनवून मागासवर्गीय घटकांचा सन्मान केला आहे. ते नवनिर्वाचित राष्ट्रपदी द्रौपदी मुर्मू यांच्या जल्लोष कार्यक्रमात बोलत होते. मागासवर्गीय घटकांना प्रवाहात आणून त्यांच्यावर सर्वोच्च पदाची सूत्रे देण्याची किमया फक्त पंतप्रधान नरेंद्र मोदीच करू शकतात. त्यामुळे खऱ्या अर्थाने आज देशाची प्रगती झाल्याची देखील मुंडे यांनी सांगितले.

आदिवासी महिलेला मिळालेल्या बहुमानाचा सन्मान करण्यासाठी दिवा शहरात भारतीय जनता पार्टीच्या वतीने दिवा शील मंडळ अध्यक्ष रोहिदास मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली फटाके फोडून, पेढे वाटून जल्लोष साजरा करण्यात आला. आदिवासी समाजाला मिळालेला हा बहुमान देशाच्या इतिहासात सोनेरी पानांनी लिहिले जाईल. याप्रसंगी दिवा शील मंडळ अध्यक्ष रोहिदास मुंडे यांच्यासह ओबीसी मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष विनोद भगत भाजपयुमो अध्यक्ष सचिन भोईर, महिला मोर्चा अध्यक्ष ज्योती पाटील, ठाणे शहर कार्यकारी सदस्य गणेश भगत, सीमा भगत मंडल संघटक सरचिटणीस दिलीप भोईर मंडळ सरचिटणीस समीर चव्हाण, युवराज यादव, ओबीसी मोर्चा अध्यक्ष रोशन भगत, डॉक्टर सेल आघाडी विद्यासागर दुबे, व्यापारी सेल अध्यक्ष जयदीप भोईर अंकुश मढवी, वीरेंद्र गुप्ता जिलाजित तिवारी नागेश पवार, राहुल साहू, आशिष पाटील, सुमित मढवी, शैलेश भोईर, सुदेश पाटील, मधुकर पाटील, गौरीशंकर पटवा, आनंदा पाटील, अवधराज राजभर, विजय वाघ, अशोक गुप्ता कार्यकर्ते उपस्थित होते.

# सावत्र पित्याला जन्मठेप; अन्य एकाला दहा वर्षांची शिक्षा

**ठाणे:** अल्पवयीन मुलीवर अत्याचार करत तिला गरोदर करणाऱ्या सावत्र पित्यासह अन्य एकाला ठाणे अतिरिक्त सत्र आणि विशेष (पोक्सो) न्यायालयाच्या न्यायाधीश व्ही व्ही वीरकर यांनी सोमवारी दोषी ठरवले. तर सावत्र पित्याला जन्मठेप तर अन्य एकाला दहा वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. या खटल्यात सरकारी वकील म्हणून रेखा हिवराळे यांनी काम पाहिले. याप्रकरणी कासारवडवली पोलीस ठाण्याच्या हद्दीत २०१८ मध्ये गुन्हा दाखल झाला होता.

पीडित मुलगी ही १६ वर्षीय असून २०१६ ते २०१८ दरम्यान ती घरात एकटी असल्याचा फायदा घेत, सावत्र पित्याने तिच्यावर लैंगिक अत्याचार करून याबाबत कोणाला काही सांगितल्यावर भावांना मारण्याची धमकी देत होता. याचदरम्यान ती गरोदर राहिली. हा प्रकार समोर आल्यावर याप्रकरणी कासारवडवली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. तपासात आणखी एकाचा समावेश असल्याचेही समोर आल्यावर त्याच्यासह सावत्र पिता अशा दोघांना अटक करण्यात आली. पोलीस तपास पूर्ण झाल्यावर याप्रकरणी ठाणे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. तर हा खटला अतिरिक्त व विशेष पोस्को न्यायालयाच्या न्यायाधीश व्ही व्ही वीरकर यांच्यासमोर आल्यावर सरकारी वकील रेखा हिवराळे यांनी १३ साक्षीदार तपासले. तसेच त्या साक्षीदारांच्या साक्षीसह सादर केलेले पुरावे ग्राहय मानून आरोपींना दोषी ठरवले. तसेच सावत्र पित्याला जन्मठेप आणि दहा हजार रुपये दंड तसेच दंड न भरल्यास १०० दिवसांची साधी कैद भोगावी लागणार आहे. तर दुसऱ्या आरोपीला दहा वर्षे सश्रम कारावास आणि दहा हजार रुपये तसेच दंड न भरल्यास १०० दिवसांची साधी कैद भोगावी लागेल. या प्रकरणाचा तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक आर व्ही रत्ने यांनी केला.

# पावसाळयात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जलशुद्धीकरण करा; अतिरिक्त आयुक्तांनी दिले निर्देश

**ठाणे:** पावसाळयात जलशुद्धीकरण केंद्रावर सुरु असलेल्या प्रचलित जलशुद्धीकरण प्रक्रियेऐवजी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जलशुद्धीकरण करण्याचे दिले निर्देश ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी पाणी पुरवठा विभागास दिले. गुरुवारी त्यांनी ठाणे शहरास पाणी पुरवठा करणाऱ्या स्वतःच्या टेमघर जलशुद्धीकरण केंद्रात होणाऱ्या जलशुद्धीकरण प्रक्रियेची पाहणी केली. यावेळी वरील निर्देश दिले.

पावसाळ्यात नागरिकांना गढूळ पाणी पुरवठा होत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. त्या पार्श्वभूमीवर नागरिकांना स्वच्छ पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टीने प्रचलित जलशुद्धीकरण प्रक्रियेऐवजी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जलशुद्धीकरण करण्याचे दिले निर्देश त्यांनी पाणी पुरवठा विभागास दिले. टेमघर जलशुद्धीकरण केंद्रातून २०० दशलक्ष घन मीटर शुद्ध पाणी पुरवठा होत आहे. या केंद्राची इमारत व यंत्रणा जुनी झाली आहे. त्याबद्दल अतिरिक्त आयुक्त माळवी यांनी नाराजी व्यक्त केली. तसेच दुरुस्ती, मजबुतीकरण व रंगरंगोटीचा प्रस्ताव तात्काळ सादर करण्याचे निर्देश संबधितांना दिले. तसेच याठिकाणी आवश्यक कर्मचारी ,तंत्रज्ञ यांच्या नेमणुकीचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देतानाच सुरक्षितेच्यादृष्टीने या ठिकाणी संरक्षण भिंत व रस्त्याचे काम सुरु करण्याच्या सूचनाही त्यांनी संबधितांना दिल्या. या पाहणी दौरयास नगर अभियंता प्रशांत सोनग्रा, अतिरिक्त नगर अभियंता अर्जुन अहिरे, मुख्य वित्त व लेखा अधिकारी दिलीप सूर्यवंशी, मुख्य लेखापरीक्षक पतंगे, कार्यकारी अभियंता विनोद पवार, विकास ढोले, तसेच इतर अधिकारी उपस्थित होते.

# कृषि यांत्रिकीकरण योजनेतून ठाण्यातील शेतकऱ्यांना १ कोटी ८५ लाखांचे अनुदान

**ठाणे:** कृषि विभागाच्या विविध योजना एकाच अर्जाद्वारे मिळावे, यासाठी शासनाने एकात्मिक संगणक प्रणाली राबविली आहे. महाडिबीटीच्या माध्यमातून योजनांचा लाभ थेट शेतकऱ्यांच्या खात्यात देण्यात येतो. कृषि यांत्रिकीकरण योजनेतून २०२१-२२ या वर्षात ठाणे जिल्ह्यातील २३७ लाभार्थ्यांना शेती औजारे/यंत्रे खरेदीपोटी सुमारे एक कोटी ८५ लाख अनुदान देण्यात आले आहे.

राज्यातील शेतकऱ्यांच्या सोयीसाठी शासनाने कृषी यांत्रिकीकरण उपअभियान, राज्य पुरुस्कृत कृषि यांत्रिकीकरण, राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत कृषि यांत्रिकीकरण या योजनांचा लाभ मिळावा, यासाठी एकच संगणक प्रणाली विकसित केली आहे. यानुसार महाडिबीटी पोर्टलवरील शेतकरी योजना या सदरामध्ये एकच अर्ज करून या सर्व योजनांचा लाभ घेता येणार आहे. यांत्रिकीकरण योजनेत शासनाने काही बदल केले आहेत. त्यानुसार, ट्रॅक्टर चलित औजारांसाठी आरसी पुस्तक बंधनकारक केले आहे. तसेच ही औजारे खरेदी ही कॅशलेस पद्धतीने करावे लागणार आहे. पूर्वसंमती अपलोड केलेल्या कोटेशन व चाचणी अहवालप्रमाणेच औजारांची खरेदी करणे बंधन कारक आहे, यासह इतर बदल यामध्ये करण्यात आले आहेत.

मिळणारी ही यंत्रे यांत्रिकीकरण योजनेत ट्रॅक्टर, पॉवर टिलर, रोटाव्हेटर, कल्टिव्हेटर, रिपर, चाफ कटर, मिनी दाल मिल ही यंत्रे खरेदी करण्यासाठी अनुदान मिळते. लाभार्थ्यांची निवड ही लॉटरी पद्धतीने होते.

# ठाण्यात प्रथमच अग्निपथ योजनेवर,तरुणांसाठी मार्गदर्शन शिबीर

ठाणे : सैन्य दलातील भरतीसाठी जाहीर झालेल्या अग्निपथ योजनेबाबत ठाण्यात प्रथमच मार्गदर्शन शिबीर भरविण्यात येत आहे. भाजपा, हिंदू रोजगार डॉट कॉम आणि विश्वास सामाजिक संस्थेच्या वतीने येत्या मंगळवारी २६ जुलै रोजी ठाण्यातील गोखले हॉलमध्ये दुपारी एक ते तीनपर्यंत शिबीर भरविण्यात आले आहे. त्यात भरतीविषयी निवृत्त कॅप्टन स्वामीनाथन व व्यक्तिमत्व विकासावर प्रिया सावंत यांच्याकडून मार्गदर्शन केले जाणार आहे.अशी माहिती आयोजक व माजी नगरसेवक संजय वाघुले यांनी दिली.

अग्निपथ योजनेबाबत तरुणांमध्ये संभ्रम पसरविला जात आहे. या योजनेचे महत्व लक्षात घेऊन मराठी तरुणांबरोबरच ठाणे जिल्ह्यातील तरुणांची भरती व्हावी, यासाठी माजी नगरसेवक संजय वाघुले व भाजयुमोच्या कोकण सहसंयोजक वृषाली वाघुले यांच्याकडून ठाण्यात प्रथमच हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. अग्निपथ योजना, या योजनेतील तरतूदी, चार वर्षांच्या सेवेनंतर मिळणारे लाभ, भविष्यातील संधी आदींबाबत शिबिरात मार्गदर्शन केले जाईल.

अल्पावधित दिवा शहरात लोकप्रिय ठरलेले वर्तमानपत्र
दिवा न्यूज
दर सोमवारी आपल्या जवळच्या स्टॉलवर उपलब्ध!

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
Weekly THANE
सोमवार,२५ जुलै २०२२


# चार सदस्यांचा एक प्रभाग करावा सरनाईकांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**ठाणे:** राज्यातील सर्व महानगरपालिकांमध्ये चार सदस्यांचा एक प्रभाग करावा अशी मागणी ओवळा माजीवडा मतदारसंघाचे आमदार प्रताप सरनाईक यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. येत्या मंत्रमंडळाच्या बैठकीमध्ये राज्यातील सर्व महानगरपालिकांमध्ये चार सदस्यांच्या प्रभाग रचना करण्याचा असलेला विषय मंजूर करून येत्या अधिवेशनामध्ये त्याची अंतीम मंजूरी घ्यावी.आमदार सरनाईक यांनी मागणीच्या निवेदनात म्हटले आहे.

शिवसेना-भाजपा या युतीच्या कार्यकाळामध्ये राज्यातील सर्व महानगरपालिकांमध्ये चार नगरसेवकांचा एक प्रभाग केला होता व त्यानुसार निवडणुकांही झाल्या होत्या.त्यामुळे बहुतांश महानगरपालिका क्षेत्रातील सर्व जाती-धर्माच्या पुरूष व महिला कार्यकर्त्यांना प्रभागातील आरक्षणानुसार निवडणुक लढण्याची संधी मिळाली आणि ते नगरसेवक म्हणून निवडूनही आले होते. त्यानंतर सर्व नगरसेवकांनी नागरिकांच्या मागणीनुसार आप-आपल्या विभागामध्ये महापालिकेच्या माध्यमातून विकासकामे केल्याने युती शासनाने केलेल्या या चार नगरसेवकांच्या प्रभागाचे सर्वत्र कौतुक झालेले आहे. परंतू, महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांनी आपल्या सोयीनुसार तीन नगरसेवकांची प्रभाग रचना केलेली असून निवडणुक आयोगाने ओबीसी आरक्षण नसताना देखील प्रभाग रचना प्रसिद्ध करून प्रारूप आराखडा प्रसिद्ध केलेला आहे. असा आरोप आमदार सरनाईक यांनी केला आहे. पण, नुकत्याच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार ओबीसी आरक्षणासहित पुढील निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. आदेशामध्ये बांठिया आयोगाने सुचविलेल्या ओबीसीच्या जनगणेनुसार सर्व महानगरपालिकांमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे आरक्षण पडलेले आहे. त्यामुळे निवडणुक आयोगाला परत एकदा ओबीसी आरक्षणासहित प्रभाग रचना करणे बंधनकारक झालेले आहे.

शिंदे-फडणवीस सरकारने युती सरकारच्या कार्यकाळात असलेल्या चार सदस्यांच्या प्रभाग रचनेनुसार पुढील निवडणुका घेतल्यास त्याचा फायदा समाजातील सर्व घटकांना होऊन जनतेची कामे करण्यास सुलभ होईल. असे म्हणत, येत्या अधिवेशनामध्ये त्याची अंतीम मंजूरी घ्यावी, अशीही विनंती सरनाईक यांनी केली आहे.

## सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना ठामपा देणार विनाशुल्क परवाना,उत्सवांच्या तयारीसाठी महापालिका आयुक्तांनी घेतला आढावा

ठाणेः यंदाचा गणेशोत्सव आणि दहीहंडीचा सण निर्बंधांविना साजरा करण्यात येणार असून ठाणे महापालिकेच्यावतीने गणेश मंडळांना उत्सवासाठी विनाशुल्क परवानगी मिळणार आहे. शुक्रवारी ठाणे महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांनी दहीहंडी, गणेशोत्सव व मोहरम आदी उत्सव काळात करावयाच्या संपूर्ण तयारीचा सविस्तर आढावा घेतला. उत्सवासाठी आवश्यक त्या सोयी-व्यवस्था वेळेत करण्यासाठी लगेचच कामाला लागण्याच्या सूचना सर्व विभागप्रमुखांना दिल्या.दरम्यान गणेशोत्सवापूर्वी रस्त्यावरील खड्डे बुजविण्याबाबत सूचना केल्या आहेत.

महापालिकेच्या कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात आयोजित आढावा बैठकीमध्ये महापालिका आयुक्त डॉ. शर्मा यांनी राज्य शासनाने दिलेल्या निर्देशानुसार सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, दहीहंडी उत्सव मंडळ व मोहरम उत्सवासाठी आवश्यक परवानग्या विनाशुल्क देण्याच्या सूचना दिल्या. यासोबतच विसर्जन घाटांवर तराफा व क्रेनची व्यवस्था करणे, गणेशोत्सवापूर्वी रस्त्यावरील खड्डे बुजविणे, मूर्ती विसर्जन ठिकाणी विद्युत व्यवस्था करणे, विसर्जन मार्गावरील झाडांच्या फाद्यांची छाटणी करणे तसेच विसर्जन घाटांवर आवश्यक कर्मचारी उपलब्ध करण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधितांना दिल्या.

कोलशेत विसर्जन महाघाट, पारसिक रेतीबंदर, कोपरी, उपवन तलाव, रायलादेवी व मासुंदा तलाव या प्रमुख विसर्जन व्यवस्थेची पाहणी प्रभाग समिती निहाय इतर संपूर्ण यंत्रणेची पाहणी करून आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना सर्व सहाय्यक आयुक्त व कार्यकारी अभियंता यांना दिल्या. तसेच इतर सरकारी यंत्रणांशी सकारात्मक समन्वय साधून उत्सवांचे नियोजन करण्याचे निर्देशही विभागप्रमुखांना महापालिका आयुक्त डॉ. शर्मा यांनी दिले.

दरवर्षीप्रमाणे श्री गणेश मुर्तींचे विधिवत विसर्जन व्हावे यासाठी महापालिकेच्यावतीने विसर्जन महाघाट, कृत्रीम तलाव तर ज्या भाविकांना विसर्जन घाट किंवा कृत्रीम तलावांच्या ठिकाणी श्री मुर्तीचे विसर्जन करता येणे शक्य नाही त्यांच्यासाठी श्री गणेश मुर्ती स्वीकार केंद्रे, फिरते विसर्जन केंद्रे उभारण्यात येणार आहेत. तसेच गणेशमूर्ती विसर्जनासाठी महापालिकेच्यावतीने ऑनलाईन टाइमस्लॉट बुकिंग सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे महापालिका आयुक्त डॉ. शर्मा यांनी सांगितले.

याच बैठकीत कोरोना संसर्गाचा आढावा ही घेण्यात आला. तसेच सध्या रुग्णसंख्या कमी असली तरी बुस्टर डोस लाभार्थी वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या. त्याचबरोबर प्रत्येक मूर्ती विसर्जन ठिकाणी महापालिकेच्यावतीने वैद्यकीय पथकाची नियुक्ती करण्यात आहे. या ठिकाणी वैद्यकीय तपासणी, अँटीजेन टेस्ट तसेच बुस्टर डोसची सोय करण्यात येणार आहे.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त (२) संजय हेरवाडे, नगर अभियंता प्रशांत सोनग्रा तसेच सर्व विभागाचे विभागप्रमुख, सहाय्यक आयुक्त तसेच कार्यकारी अभियंता आदी उपस्थित होते.

## उलटलेल्या ट्रकखाली अडकुन मुलीचा मृत्यू ; चालकाला अटक

**ठाणे:** मुंबईकडून नाशिकला निघालेला ट्रक चालकाचा ट्रकवरील ताबा सुटला आणि तो ट्रक रस्त्याच्या बाजूला वस्ती करून राहणाऱ्या एका झोपडीवर उलटला. या घटनेत त्या झोपडीत झोपी गेलेली १४ वर्षीय मधु भाटी या मुलीचा ट्रकखाली अडकल्याने मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास रुस्तमजी समोर, लोढा, माजिवडा येथे घडली. या दुर्घटनेला जबाबदार धरून ट्रकचालक दीनानाथ यादव (४३) याला कापूरबावडी पोलिसांनी अटक केली.

चालक यादव हा रिकामा ट्रक घेऊन मुंबईकडून नाशिककडे निघाला होता. मुंबई नाशिक महामार्गावरील माजीवडा उड्डाणपूल सोडल्यावर अचानक चालकाचा ट्रकवरील ताबा सुटला. तसेच त्या महामार्गावरील रस्त्याच्या बाजूला वस्ती करून टेडी बेअर, खेळणी विक्री करणाऱ्या एका झोपडीवर जाऊन उलटला. हा प्रकार घडला तेंव्हा त्या झोपडीत मधू ही झोपी गेलेली होती. बरोबर तिच्या अंगावर जाऊन तो ट्रक पडला. या घटनेची माहिती वाहतुक शाखेचे पोलीस मनोज रावत्या यांनी आपत्ती व्यवस्थापन विभागाला दिली. तातडीने घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, कापूरबावडी वाहतूक पोलीस, कापूरबावडी पोलीस आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेतली. तसेच यावेळी पाचारण केलेल्या दोन क्रेनच्या मदतीने ट्रकला उचलण्यात आले आणि त्या मुलीला बाहेर काढून तात्काळ ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले. त्यावेळी डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. याप्रकरणी कापूरबावडी पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद करत, ट्रक चालक यादव अटक केल्याची माहिती कापूरबावडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम सोनावणे यांनी दिली.

### पार्क केलेल्या गाड्यांवर झाड कोसळले

ठाणेः तलावपाळी,डॉ. मुसरोड, नौकाविहार समोरील दिपक सोसायटीच्या आवारामधील झाड पार्क केलेल्या तीन वाहनांवरती पडल्याची घटना रविवारी मध्यरात्री २ वाजून ५२ मिनिटांच्या सुमारास घडली. यामध्ये एका कारचे नुकसान झाले आहे. तसेच पडलेले झाड कापून बाजूला करण्यात आले आहे. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, वृक्ष प्राधिकरण विभागाचे कर्मचारी व अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेतली.

## जिल्ह्यातील काँग्रेस,राष्ट्रवादीचे नगरसेवक लवकरच होणार शिंदे गटात सामील- जिल्हाप्रमुख नरेश म्हस्के

**ठाणे:** शिवसेना आणि युवासेनामधील आमदार , खासदार, नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते हे शिंदे गटात सामील होत असताना, ठाणे जिल्हयातील काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांमधील नगरसेवकांनी ही शिंदे गटात दाखल होण्याची तयारी दाखवली असल्याचा खळबळजनक गौप्यस्फोट करून लवकरच जिल्ह्यात राजकीय भूकंप होणार असल्याचे संकेत शिंदे गटाचे ठाणे जिल्हाप्रमुख नरेश म्हस्के यांनी शनिवारी ठाण्यात झालेल्या एका पत्रकार परिषदेत दिले.

मात्र यावेळी म्हस्के यांनी किती जण सामील होतील हे सांगितले नाही.

शनिवारी ठाण्यात युवासेनेचे विस्तारक नितीन लांडगे यांनी आपल्या पदाचा राजीनामा देत, शिंदे गटात सामील होण्याचा निर्णय घेतला. यासंदर्भात माहिती देण्यासाठी बोलविलेल्या पत्रकार परिषदेत म्हस्के बोलत होते. तर लांडगे यांनी दोन दिवसापूर्वी आदीत्य ठाकरे यांच्या स्वागतासाठी हजेरी लावली होती. त्यानंतर शनिवारी त्यांनी शिंदे गटात सामील होत असल्याचे जाहीर केले आहे.यावेळी , म्हस्के यांनी आणखी आमदार, खासदार शिंदे गटाला पाठींबा देत असल्याचेही सांगितले.

ठाणे जिल्ह्यातील युवा सेनेचे पदाधिकारी राजीनामा देत आहेत, त्यानंतर आता संपूर्ण राज्यात युवा सेनेचा दौरा खासदार डॉ श्रीकांत शिंदे, जिल्हा प्रमुख नरेश म्हस्के यांच्यासह करणार असल्याची माहिती यावेळी पूर्वेश सरनाईक यांनी दिली.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
कोकण ग्रामीण वार्ता
सोमवार, २५ जुलै २०२२


# चिपळूण, खेड, लांजा, राजापूर, संगमेश्वर या तालुक्यातील २९१ गावे इकोसेन्सिटीव्ह झोनमध्ये

**रत्नागिरी:-(एम.काझी)** केंद्रीय पर्यावरण व जलवायु परिवर्तन मंत्रालयाने ६ जुलैला इको इकोसेन्सिटीव्ह संदर्भात अधिसूचना काढली आहे. कस्तुरीरंगन समितीच्या अहवालानुसार चिपळूण, खेड, लांजा, राजापूर, संगमेश्वर या तालुक्यातील एकूण २९१ गावे इकोसेन्सिटीव्ह झोन मध्ये आहेत. त्यानुसार या क्षेत्रातील लोकांना बांधकाम, खाण संदर्भातील प्रकल्पांवरही बंदी येणार आहे. त्याशिवाय २० हजार स्क्वेअर फूटापेक्षा अधिक बांधकामांना मनाई करण्यात येणार आहे. यासंदर्भातील हरकती ६० दिवसात नोंदवणे आवश्यक आहे.

**तालुक्यातील कोणती गावे इकोसेन्सिटीव्ह झोनमध्ये**

**चिपळूण तालुका :**

तिवरे, रिक्टोली, बामणोली, पेढे परशुराम, तिवडी, कादवड, नांदिवसे, मोरवणे, स्वयंदेव, खोपड, गणेशपूर, कळकवणे, गाणे, ओवळी, पेढांबे, कोळकेवाडी, अडरे, कामथे खुर्द, टेरव बु., मुंढे तर्फ चिपळूण, खरवते, अनारी, उभळे, शिरगाव, कुंभाली, कोंडमळा, कोंडफणसवणे, तळसर, पोफळी, कुडप, पोफळी बु., डेरवण, तुरंबव, मुंढे तर्फ सावर्डा, ढाकमोली, फुरुस, दुर्गवाडी खुर्द, दुर्गवाडी, मंजुत्री, तळवडे, पाथे, मजरेगोवळ, कुटरे.

**खेड तालुका :**

तुळशी बु., तुळशी खुर्द, वडगाव बुद्रुक, शिवतर, कळंबणी खुर्द, कसबा, नातू, पाखरवाडी, दहीवली, वाडी बेलदार, दिवाणखवटी, वडगाव खुर्द, किंजळेतर्फ नातू, बिरामणी, कोंडवाडी, घेरापालगड, शिंगरी, पुरेखुर्द, जामगे, घेरा सुमारगड, कांदोशी, विहळी, किंजळेतर्फ खेड, नांदिवली, कळंबणी बु., वाडी मालदे, पोयनार खुर्द, साखरोळी खुर्द, तिसे खुर्द, अस्तान, घेरा रसाळगड, वाडीबीड, चाटव, प्रभूवाडी, देवघर, हुंबरी, खालची (हुंबरी), सनाघर, कर्टेल, चिंचवाडी, वरोवली, आंबवली, नवानगर, कुंभाड, नांदगाव, संगलट, शिरगाव, खोपी, निवे, बजरंगनगर, मोरवंडे खुर्द, चोरवणे, शिरगाव खुर्द, मिर्ले, शिव खुर्द, तळवट खेड, सापिर्ली, तळवट जावळी, चोरवणे उतेकरवाडी, तळवट पाल, कवळे, कासई, अष्टीमोहल्ला, साखर, भेलसई बुधवाडी, धामणंद, भेलसई चौथाई, वावे चिंचवाडी, धामणंद गावठाण, केळणे, जावळी गावठाण, झगडेवाडी, कुंभवली, कुरवळ गावठाण, आंबडस

> **६० दिवसात हरकती नोंदवण्याच्या सूचना, बांधकाम करण्यास येणार मर्यादा**

**लांजा तालुका :**

वेसुर्ले, शिरंबवली, कोचरी, डाफळे, सालपे, कुरचुंब, माचाळ, चाफेट, कांगवली, वेरळ, चिंचुर्टी, खोरनिनको, पालू, आगरगाव, हसोळ, कुंभारगाव, प्रभानवल्ली, गुरववाडी, खानवली, वाघ्रट, कांटे, बुध्दवाडी वेरवली बु., माजळ, रामगाव, इसवली, जावडे, भांबेड, पूरगाव, कुडेवाडी, भडे, हर्दखळे, बापेरे, निवोशी, पुरंग, वाकेड, कोंडगे, पनोरे, विलवडे, रुण, आरगाव, खोरगाव, बोरथडे, हर्चे, कोंडगाव, रिंगणे.

**राजापूर तालुका :**

झर्ये, वाटूळ, येरडव, कोंड दसुर, परुळे, चिखले, कोंडसर खुर्द, पांगारी खुर्द, तिवरे, धामणपे, हरळ, वरची गुरववाडी, कोतापूर, कोळवणखडी, सौंदळ, खिणगिणी, केळवडे, पाथार्डे, पाचल, आग्रेवाडी, भराडे, करक, हर्डी, गोठणे, दोनिवडे, ओशिवळे, वाळवड, कार्जिडा, फुपेरे.

**राजापूर तालुका :**

कोळंब, पहिलीवाडी (ताम्हाणे), जांभवली, मिळंद, बागकाझी हुसेन, हसोळ तर्फ सौंदळ एक गाव, पांगारी बु., सावडाव, हातदे, डोंगर, मोसम, महाळुंगे, पन्हळे तर्फ सौंदळ, शेजवली, वाल्ये, बांदिवडे, प्रिंदावणे, कुंभवडे, पाले.

**संगमेश्वर तालुका :**

कुंभारखणी बु., शिरंबे, रातांबी, राजीवली, शिंदे आंबेरी, विकासनगर, आसवे, कासे, कुचांबे, कुटगिरी, पाचांबे, रांगव, आंबेत, मावळंगे, तुरळ, शेनवडे, कोंड भैरव, मासरंग, कातुर्डी कोंड, निवळी, गोळवली, श्रृंगारपूर, तांबेडी, अणदेरी, शेंबवणे, कुंभारखाणी खुर्द, हेदली, धामणी, डिंगणी, नायरी, पिरंदवणे, मांजरे, तिवरे घेराप्रचितगड, असुर्डे, मालदेवाडी, उंबरे, संगमेश्वर, उपळे, कोंड आंबेड, किंजळे, वाशी तर्फ संगमेश्वर, देवळे घेराप्रचितगड, कुळे, कुरधुंडा, फणसवळे, सायले, काटवली, ताम्हनले, कुंडी, निगुडवाडी, गोठणे, बेलारी बु. कोंड ओझरे, तळवडे तर्फ देवरुख, मठ धामापूर, चांदिवणे, बेलारी खुर्द, बामणोली, सोनारवाडी, मारळ, आग्रेवाडी, करंडेवाडी, हातिव, खडीकोळवण, आंगवली, कोंड्रण, देवघर, बोंडये, ओझरे बु. निवधे, चाफवली, निनावे, दखीण, मुर्शी, भडकंबा, भोवडे, किरबेट, देवडे, वाडी आदिष्टी.

## जि. प. शाळा मासू २ ता.गुहागर जि. रत्नागिरी येथे हर घर तिरंगा अंतर्गत प्रभात फेरी

**रत्नागिरी:-** जिल्हा परिषद शाळा मासू २ येथे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत शाळेची प्रभातफेरी करण्यात आली.

केंद्र आबलोली तालुका गुहागर येथील शाळेने जिल्हा परिषद रत्नागिरी व पंचायत समिती गुहागर यांच्या सूचनेनुसार गावात प्रभात फेरी काढण्यात आली.

या वेळी गावात प्रभात फेरी काढून जन जागृती करण्यात आली.. विद्यार्थ्यांनी घोषणा देऊन परिसर दुमदुमुन टाकला व साथीला वरुणराजा देखील उपस्थित होता..

वाडीतील प्रत्येक घरी जाऊन ग्रामस्थांना स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्याची माहिती देण्यात आली.या वेळी ग्रामस्थांनी हर घर तिरंगा या उपक्रमास साजरा करू असे सांगितले.. विविध घोषणा पत्र घेऊन मुले घोषणा देत होती. कोणतेही ध्वजारोहण नसताना मुले का घोषणा देत आहेत या कुतूहलाने ग्रामस्थ घराबाहेर पडून पाहत होते. शाळेचे मुख्याध्यापक प्रत्येक ग्रामस्थांना हर घर तिरंगा या विषयी माहिती देत होते.या वेळी ग्रामस्थ मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

## रत्नागिरी जिल्हा परिषद कारभार प्रभारींच्या हाती

**रत्नागिरी:**मिनी मंत्रालय म्हणून ओळखल्या जाण्र्या जिल्हा परिषदेचा कारभार चालवताना अधिकारी, कर्मच्रयांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. वर्ग १ पासून ते वर्ग ४ पर्यंतची २ हजार ८३३ पदे रिक्त आहेत. त्यातील वर्ग ३ पदे सर्वाधिक असल्यामुळे सगळीकडेच प्रभारींचे राज्य आहे. त्यातही पशुसंवर्धन, शिक्षण विभागातील अधिक्रयांची पदे रिक्त आहेत.ग्राम विकासाठीसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये त्रिस्तरीय रचना केली आहे. गावस्तरावर ग्रामपंचायत, तालुकास्तरावर पंचायत समिती आणि जिल्हास्तरावर जिल्हा परिषद कामकाज चालते. राज्य शासनाची जी विविध खाती आहेत, त्याप्रमाणेच जिल्हा परिषदेचे कामकाज चालवले जाते. विविध विकासकामांची मान्यता देणे, पाहणी करणे, त्याची बिले काढणे ही कामे केली जातात. पशुसंवर्धन, कृषी विभागाकडून शेतक्रयांसाठी योजना राबविल्या जातात. पाणी पुरवठा विभागामार्फत नवीन नळपाणी योजना राबवणे, त्यांची देखभाल दुरुस्ती करणे ही कामे करतात. अधिकारी,कर्मचार्यांची पदे रिक्त राहिल्यामुळे अनेक पदांवर प्रभारी नियुक्त्या केल्या आहेत.

## पर्यटनाला चालना देण्यासाठी २० कोटींचे प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर

**रत्नागिरी:**रत्नागिरीला महाराष्ट्रातील पर्यटनाच्या दृष्टीने स्थान आहे. जिल्ह्यात अनेक ठिकाणी पर्यटन स्थळे आहेत. थिबा राजवाडा, जिजामाता उद्यान, गणपतीपुळे, भगवती बंदर, टिळक जन्मस्थान, पावस, गणेशगुळे तसेच कातळ शिल्प यांचेही आकर्षण वाढले आहे.

या माध्यमातून पर्यटकांचे लक्ष्य जिल्ह्याकडे वेधण्यासाठी पुरातत्व विभागाने पर्यटनाला चालना देण्यासाठी २० कोटींचे प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर केले आहेत.

केरळ, गोवा येथील पर्यटनाच्या धर्तीवर आता वॉटर स्पोर्टस्, स्पीडबोट या नव्या संकल्पनांना उभारी मिळाली आहे. जिल्ह्याला प्राचीन, ऐतिहासिक वारसा लाभलेल्या अनेक वास्तू आहेत. त्याचे जतन केले तर पर्यटनालाही अधिक चांगल्या प्रकारे चालना मिळू शकते. जयगड, पूर्णगडसारख्या किल्ल्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाने निधी दिल्यानंतर तेथेही पर्यटक आकर्षित होतील. दिवाळी, ख्रिसमस, मे महिना या सुट्टीच्या काळात लाखो पर्यटक कोकणात येतात.

## रत्नागिरीच्या मनोरुग्णालयात कर्मचाऱ्यांच्या रिक्तपदांमुळे प्रचंड ताण, पाच जिल्ह्याचे केंद्र ; १४४ पैकी ६४ पदे रिक्त

**रत्नागिरी:** पाच जिल्ह्यातील मनोरुग्णांचा भार असलेल्या येथील प्रादेशिक मनोरुग्णालयातील कर्मच्रयावर रिक्तपदांमुळे प्रचंड ताण वाढला आहे. एकूण मंजूर पदांपैकी ५० टक्केच्या वर पदे रिक्त आहेत. पदे भरण्यासंदर्भात शासनाकडे वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला आहे. मात्र त्यावर अपेक्षित प्रतिसाद मिळालेला नाही. कोरोना काळात रुग्णसंख्या कमी होती. मात्र आता ती वाढल्यामुळे कार्यरत असलेले कर्मचारी हैराण आहेत. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सांगली आणि मिरज या पाच जिल्ह्यांसाठी येथा प्रादेशिक मनोरुग्णालय आहे. रुग्णालयात आता २०० मनोरुग्ण आहेत. त्यांच्या देखभालीची मोठी जबाबदारी वैद्यकीय अधिकारी किंवा कर्मच्रयांवर आहे. एकूण १४४ मंजूर पदे आहेत. त्यापैकी ६४ पदे रिक्त आहेत. यामध्ये वर्ग १ चे १ पद रिक्त आहे. चतुर्थश्रेणीतील ३८ पदे, ब गटातील ३ आणि क गटातील १७ पदांचा यामध्ये समावेश आहे.

रुग्णांची संख्या अधिक असल्याने या रुग्णांची देखभाल करण्यासाठी आवश्यक असलेल्या चतुर्थ श्रेणीतील संवर्गातील कर्मच्रयाची सर्वाधिक पदे रिक्त आहे. मनोरुग्ण असल्याने या रुग्णांच्या नैसर्गिक विधीसह, त्यांच्या नाष्टा-पाणी जेवणाची आणि विश्रांतीसंदर्भातील जबाबदारी या संवर्गातील कर्मच्रयांवर असते.

धोकादायक रुग्ण स्वतंत्र असले तरी काही रुग्ण एकाच ठिकाणी असतात. त्यांच्या सुरक्षेच्यादृष्टीने रुग्णालय प्रशासनाला लक्ष ठेवावे लागते. कोरोना काळामध्ये रुग्णांची संख्या कमी होती. त्यामुळे कर्मच्रयांवर तेवढा ताण नव्हता. मात्र आता रुग्ण संख्या २०० आहे. एवढ्या रुग्णांची देखभाल करताना कर्मच्रयांच्या नाकीनऊ येत आहे. रुग्णालय प्रशासनाने ही रिक्त पदे तत्काळ भरण्यात यावी, यासाठी वारंवार शासनाकडे पाठपुरावा करीत आहे. परंतु त्याला अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. अनेक नातेवाईक मनोरुग्णांना दाखल करून निघुन जातात. काहीवेळा खोटा पत्ता देतात. त्यामुळे बरे झालेले अनेक रुग्ण नातेवाईकच नसल्याने रुग्णालयात आहेत.

# परशुराम घाटात कोसळणाऱ्या दरडींवर 'सीसीटीव्ही'ची नजर!

**खेड:-** मागील काही दिवस कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे परशुराम घाटात दरडी कोसळण्याचे प्रमाण वाढले आहे. या दरडींमुळे वाहतूक बंद ठेवण्याची वेळ प्रशासनावर आली होती. चौपदरीकरणामुळे या दरडी कोसळण्याचे प्रमाण वाढले आहे. चौपदरीकरणाच्या रखडलेल्या कामाबाबत ॲड ओवेस पेचकर यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर ७ जुलैला सुनावणी झाली. सुनावणी वेळी न्यायालयाने परशुराम घाटाच्या रखडलेल्या कामाबाबत नाराजी व्यक्त केली. दरडी कोसण्याचा धोका असलेल्या ठिकाणी सीसीटिव्ही कॅमेरे बसवून घाटावर नजर ठेवण्याच्या सूचना न्यायाधीश मेनन आणि कर्णिक यांनी दिल्या. त्याचबरोबर रात्रीच्या वेळी दरडी कोसळण्याचा धोका असलेल्या ठिकाणी हॅलोजन लाईट सह अन्य उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या.

मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील परशुराम घाटात सहा दरडप्रवण क्षेत्रात दोन कंत्राटदार कंपन्यांच्या माध्यमातून आवश्यक त्या उपाययोजना केल्या आहेत. यातूनच गुरूवारपासून सीसीटीव्ही कॅमेरे घाटात बसवण्यात आले आहेत. कल्याण टोलवेज कंपनीकडून घाटातील वरच्या बाजूस चार ठिकाणच्या दरडप्रवण क्षेत्रात कॅमेरे बसवण्यात आले आहे. आणि याच ठिकाणी शेडमध्ये त्याचे नियंत्रण युनिट बसवण्यात आले आहे. तेथे २४ तास कर्मचारी लक्ष ठेवून आहे, तर ईगल इन्फ्राकडून २ ठिकाणी कमेरे बसवण्यात आले आहेत.


प्रगती बेरोजगार सेवा सहकारी सोसायटी (मर्या.)
उपरोक्त संस्थेमार्फत नामांकित कंपनीमध्ये खाली दिलेल्या रिक्त पदांसाठी त्वरित पात्र उमेदवार पाहिजेत.
➔ टेलिकॉलिंग ➔ कॉल सेंटर
➔ मॅकेनिक ➔ सेल्स मार्केटिंग
➔ फार्मासिस्ट ➔ अकाऊंटन्ट
➔ टेक्निशियन ➔ बॅक ऑफिस
➔ कार मॅकेनिकल
-:अधिक माहितीसाठी संपर्क:-
आकाश गायकवाड ✆ ८२८६९७८४००

आपल्या उत्पादनाची/संस्थेच्या योजनांची जाहिरात करण्यासाठी दिवा शहरातील हक्काचे माध्यम..!
दिवा न्यूज
संपर्क:-९९८७५१२००१

LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

बाबूजी मल्टिसर्व्हिसेस
कामे तुमची साथ आमची!
• इन्शुरन्स (सुविधा/विमा सल्लागार) आयटीआर • जीएसटी सर्व्हिसेस
• बिझनेस सपोर्ट सर्व्हिसेस • प्लेसमेंट • लीगल सर्व्हिसेस • योग आणि आयुर्वेदिक उपचार
प्रोप्रा. बाबुराव खेडेकर
सदैव आपल्या सेवेत!
संपर्क : 9702442024 / 9967721950
Facebook / Youtube Channel - सत्याग्रह
ब्लॉग - http://creativemaratha.blogspot.com

जय भवानी
आर्टस् ॲन्ड प्रिंटर्स
स्क्रिन व ऑफसेट प्रिंटिंग
डि. टी. पी. ( मराठी / इंग्रजी / हिंदी )
व्हिजिटिंग कार्ड | फलेक्स / बॅनर
बिल बुक | चलन बुक
लेटर हेड | आय कार्ड
टि-शर्ट प्रिंटिंग | स्टिकर
लग्न पत्रिका | निमंत्रण पत्रिका
येथे सर्व प्रकारचे प्रिंटींग करुन मिळेल.
आमच्याकडे म्युच्युअल फंड, हेल्थ इंन्शुरन्स (मेडिक्लेम), टर्म इंन्शुरन्स तसेच सर्व प्रकारचे इंन्शुरन्स काढुन मिळेल.
पत्ता:- ०६, जिवदानी अपार्टमेंट, मुंब्रादेवी कॉलनी रोड, गुरुदर्शन नगर, वारेकर शाळेजवळ, दिवा (पूर्व) ठाणे - ४०० ६१२.
संपर्क :- मंगेश सकपाळ ✆ ७०२१९४२१२३, ९९८७५१२००१
Email id : jaybhawaniarts@gmail.com

दिवा रत्न पुरस्कार भेटलेले डॉ. महाजन यांचे सुसज्ज हॉस्पिटल
एस हॉस्पीटल (मल्टीस्पेशालिटी)
आणि रिसर्च सेंटर
ISO 9001:2015
कोरोनामध्ये सामान्य माणसाला आधार!
आम्ही देत आहोत परवडणाऱ्या दरामध्ये
दिवा वासियांना आरोग्य सुविधा
हृदयविकार, पॅरालीस, ॲक्सीडेंट व इ. व्हेंटीलेटर, बायपॅपसह
➤ जनरल वॉर्ड फक्त 999/- प्रती दिवस
➤ ICU अतिदक्षता विभाग फक्त 2999/- प्रती दिवस
(हॉस्पिटलचे डॉक्टर, नर्सेस, बेड चार्जेस)*
स्त्री रोग, अल्पदरात प्रस्तुती, लहान मुलांचे आजार, मुत खडा, लेझर (दुर्बीनद्वारे) शस्त्रक्रिया, हायरिस्क प्रसुती

*आपल्या कुटुंबाचा मेडिक्लेम फक्त 20/- मध्ये प्रति दिवस
*मोफत नर्सिंग कोर्सेस (सरकार मान्यता प्राप्त)
संतोष कॉम्प्लेक्स, बी-विंग, पहिला मजला, दिवा-आगासन रोड, मयुर हॉटेल जवळ, दिवा (पूर्व) ठाणे
9322336970 | 9833804555 | 9022391879

# खड्ड्यातून ठाणेकरांची सुटका करा सचिन शिंदे यांचे आयुक्तांना पत्र

**ठाणे:**पावसाळा आला की रस्त्यांवर खड्डे हे ठाणोकरांसाठी नित्याचीच बाब झाली आहे. मात्र या खड्ड्यातून ठाणेकरांची सुटका होणार आहे का नाही ?असा सवाल ठाणे शहर कॉंग्रेसचे सरचिटणीस व मुख्य प्रवक्ते सचिन शिंदे यांनी उपस्थित केला आहे. मुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदे विराजनमान झाल्यानंतर ठाण्यातील एकही लोकप्रतिनिधी किंवा वरीष्ठ राजकीय नेता,या खड्ड्यांच्या विरोधात बोलतांना दिसत नाही. त्यांना सर्वसामान्य ठाणेकरांचे काही घेणे देणे आहे का नाही ?असा सवालही त्यांनी ठाणे महापालिकेच्या आयुक्तांना दिलेल्या निवेदनपत्रात उपस्थित केला आहे.

ठाण्याच्या विविध भागात रस्त्यांवर खड्डे पडण्यास सुरवात झाली.खड्डे बुजविण्यासाठी महापालिका प्रशासन दरवर्षी ४ कोटीहून अधिकचा निधी खर्ची करत आहे.मात्र एवढे करुनही ठाणेकरांना रस्ते काही चांगले मिळत नसल्याची टिका देखील सचिन शिंदे यांनी केली आहे.पावसाळ्यापूर्वी शहरातील अनेक रस्ते चकाचक करण्यात आले आहेत.तसेच राज्य शासनाकडून देखील महापालिकेला रस्त्यांसाठी २५० कोटींच्या आसपास निधी मिळाला आहे.त्यातून देखील रस्त्यांची कामे करण्यात येत आहेत. परंतु ती देखील योग्य पध्दतीने केली जात आहेत का नाही ?या बाबतही शिंदे यांनी शंका उपस्थित केली आहे.पावसाळ्यापूर्वी आधी चकाचक रस्त्यांसाठी कोट्यावधींचा निधी खर्च करायचा आणि पुन्हा पावसाळ्यात त्याच रस्त्यांवर खड्डे पडल्यावर पुन्हा कोट्यावधींचा निधी खर्च करायचा. यातून केवळ ठाणेकरांच्या कररुपी पालिकेला दिल्या जाण्रया पैशाची उधळपट्टीच केली जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

त्यातही महापालिकेकडून खड्डे भरण्यासाठी दरवर्षी नवनवीन तंत्रज्ञान वापरले जात आहे.मात्र हे नवीन तंत्रज्ञानही फेल ठरत असल्याचे दिसत आहे .त्यामुळे त्यावर केला जाणारा खर्च देखील हा वायाच जात असल्याचे सचिन शिंदे यांनी सांगितले. या खड्ड्यांमुळे होणारी वाहतुक कोंडी ही देखील ठाणेकरांसाठी मोठी समस्या होऊन बसली आहे.त्यातून सर्वसामान्य नागरिक नाहक भरडला जात आहे.त्याचे सोयरसुतकही कोणत्याही राजकीय पक्षातील लोकप्रतिनिधींना किंवा मोठ्या पुढ्यायांना नाही.आता ते देखील आळी मिळी गुपचीळीच्याच भुमिकेत असल्याचे दिसत आहेत.त्यामुळे या खड्ड्यांवर योग्य ती उपाय योजना करावी,ठाणेकरांना चांगले रस्ते द्यावेत अशी मागणी त्यांनी यावेळी केली आहे.

# ठाणेकरांना मिळणार १ऑगस्ट पासून ५० एमएलडी अतिरिक्त पाण्याचा लाभ

## जलसंपदा विभागाने ठाणे शहराला अतिरिक्त पाणी देण्याला दिली मंजुरी,मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने ठाणेकरांना मिळाला मोठा दिलासा

**ठाणे :** ठाणे शहरातील नागरिकांना १ ऑगस्ट पासून ५० एमएलडी अतिरिक्त पाणीपुरवठा करण्याला राज्याच्या जलसंपदा विभागाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे विस्तारित ठाणे शहरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकतीच ठाणे जिल्ह्यातील पाणी प्रश्नावर आढावा घेण्यासाठी सह्याद्री अतिथीगृहात बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीत त्यांनी राज्याच्या जलसंपदा विभागाला ठाणे शहराला अतिरिक्त पाणीपुरवठा करण्याचे निर्देश दिले होते. यानुसार राज्याच्या जलसंपदा विभागाने अतिरिक्त ५० एमएलडी पाणी देण्याला मंजुरी दिलेली आहे. त्यामुळे ठाणे शहराला मोठा दिलासा मिळाला आहे. खर तर ठाणे शहराचा वेगाने विस्तार झाल्यामुळे विस्तारित ठाणे शहराला पाणी पुरवठा करताना ठाणे महानगरपालिकेला मोठी कसरत करावी लागत होती.

मात्र आता हे पाणी मिळाल्यामुळे त्यांना दिलासा देणे पालिकेला देखील शक्य होणार आहे.

ठाणे शहराला दररोज ४८५ दशलक्ष मिलिलिटर एवढा पाणीपुरवठा करण्यात येतो मात्र वाढत्या लोकसंख्येमुळे तो देखील अपुरा पडू लागला होता. मध्य वैतरणा जलाशयाची उंची वाढवण्यात आल्याने जास्त पाणी अडवणे शक्य होत असल्याने आता ठाणे शहराला १०० एमएलडी अतिरिक्त पाणीपुरवठा करण्यात यावा अशी मागणी ठाणे महानगरपालिकेने मुख्यमंत्र्यासोबत झालेल्या बैठकीत जलसंपदा विभागाकडे करण्यात आली होती. या मागणीला अनुसरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हे पाणी तातडीने देण्याचे निर्देश जलसंपदा विभागाला दिले होते.

त्यानुसार ठाणे शहराची तातडीची गरज भागवण्यासाठी जलसंपदा विभागाने ५० एमएलडी पाणी येत्या १ ऑगस्ट पासून ठाणे शहराला देण्याच्या निर्णयाला मंजुरी दिली आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी पदग्रहण केल्यानंतर शहराला पहिली मोठी भेट मिळाली आहे.

# ठाण्यात पाण्याची टाकी फुटली; २१ घरांचे नुकसान,७५ वर्षीय आजीबाई जखमी

**ठाणे:** ठाणे महानगरपालिकेची ७५ हजार लिटर पिण्याच्या पाण्याची ऑस्ट्रेलियन बनावटीची रीनोटँक टाकी फुटल्याची घटना शनिवारी सकाळी साडेसहा वाजण्याच्या वागळे इस्टेट रोड क्रमांक ३३,रुपादेवी देवी टेकडी, सुमारास समोर आली. या दुर्घटनेत २१ घरांचे नुकसान झाले आहे. यामध्ये ६ घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे सांगण्यात आले आहे.

तर ७५ वर्षीय तानुबाई श्रवण मुठे या आजीबाई जखमी झाल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षेने दिली.

वागळे इस्टेट, रोड क्रमांक ३३,रुपादेवी देवी टेकडी, रूपादेवी पाडा,महालक्ष्मी मंदिर जवळ, ख्रिश्चन कब्रिस्तान समोर असलेली २००९ साली बांधण्यात आलेली ऑस्ट्रेलियन बनावटीची ठाणे महानगरपालिकेची ७५ हजार लिटर पिण्याच्या पाण्याची (रीनोटँक) टाकी सकाळी फुटून पाणी जवळच असलेल्या झोपडपट्टीतील घरावरती मोठया प्रेशरणे गेल्यामुळे त्या झोपडपट्टीतील घरांच्या भिंती व छप्पर तुटून मोठ्या प्रमाणात नुकसान  झाल्याची अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षेला मिळाली, त्यानुसार घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे अधिकारी व कर्मचारी, ठाणे आपत्ती प्रतिसाद दलाचे जवान,चे अधिकारी व जवान, वागळे पोलीस कर्मचारी, कार्यकारी अभियंता, उप अभियंता, कनिष्ठ अभियंता (पाणी पुरवठा विभाग, लोकमान्य सावरकर नगर प्रभाग समिती) यांच्यासह स्थानिक माजी नगरसेवकांनी धाव घेतली . या दुर्घटनेत तानुबाई मुठे या आजीबाईंचा उजव्या पायासह उजव्या हाताला व कंबरेला गंभीर दुखापत झाली आहे. त्यांना तातडीने लोकमान्य नगर येथील लोकमान्य हॉस्पिटलात उपचारासाठी दाखल केले आहे. तर घटनास्थळी ६-घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. व इतर १५-घरांचे किरकोळ नुकसान झाल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन अधिकारी अविनाश सावंत यांनी दिली.

दिवा न्यूज

दर सोमवारी वाचकांच्या भेटीला...सोमवार ते रविवार स्टॉलवर उपलब्ध असणारे वर्तमानपत्र!